जावक क्र. 1431 /२०१९
विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणे
दि. २५/०२/२०१९

प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो.
पोलीस आयुक्तालय, पुणे शहर

यांना सविनय सादर

प्रतिवेदक : ए.एल.चौधरी,महिला पोलीस उप-निरीक्षक, विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणे

यांजकडुन विनंतीपुर्वक की,

विषय : बेवारस मयत अनोळखी इसमाचा व त्याच्या नातेवाईकांचा तपास होणेकामी सर्व वर्तमान पत्रात माहिती प्रसिद्धी होणेबाबत...

संदर्भ : विश्रामबाग पो.स्टे. पुणे अ. मयत रजि. नं. ६६/२०१८ फौ.प्र.सं.कलम १७४ दि. १/१०/२०१८

---

विश्रामबाग पोलीस स्टेशन अकस्मात मयत रजि. नं. ६६/२०१८ फौ.प्र.सं.कलम १७४ दि. १/१०/२०१८ मधील अनोळखी महिला वय अंदाजे ५५ वर्षे, नाव,पत्ता माहित नाही.ती दि.२७/९/२०१८ रोजी महात्मा फुले मंडई शुक्रवारपेठ,पुणे येथे आजारी व अशक्त मिळुन असल्याने त्यांना उपचार कामी नामदेव सुर्यवंशी,१०८ ॲमब्युलन्स,मो.नं.९९६०६६६३०६ तसेच मपोशि ९२१४ गायकवाड वि.बाग.पो.स्टे पुणे यांनी दि. २७/९/२०१८ रोजी रात्रौ २२/०० वा.ससुन हॉस्पीटल येथे वार्ड क्र.१४ मध्ये ॲडमिट केले असता, उपचारादरम्यान दि. ०१/१०/२०१८ रोजी सकाळी ०७.०० वा. वॉर्डात मयत झाली. त्याचे एम.एल.पी.एम.नं. ४९५४/१८ अन्वये ससुन हॉस्पीटल डेड हाऊस पुणे येथे पोस्ट मार्टेम झाले असुन त्याचा एम.एल.सी.नं. २१९३७/१८ असा आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे,

**पुर्ण नाव- अनोळखी महिला वय अंदाजे ५५ वर्षे, नाव,पत्ता माहित नाही.**

**वर्णन -उंची अंदाजे ५फुट,२ इंच,मध्यम बांधा,रंग सावळा,चेहरा गोल,डोक्यावर काळे पांढरे बट असल्यासारखे केस,नाक सरळ,जवळ मौल्यवान चिज वस्तु नाही.**

तरी दाखल मयताचे नावाचा व त्याचे वारसांचा तपास होणेकामी सर्व वर्तमान पत्रात माहिती प्रसिद्ध होणेस विनंती आहे. संपर्क क्र. विश्रामबाग पो.स्टे.पुणे ०२०-२४४५७७५०